दै. सत्यप्रभा दि: 07/09/24

# हॉटेल चालकाचा खून; आरोपी मुलासह तिघांना पोलीस कोठडी

नांदेड,दि.७ – शहरातील वाघी रोडवरील एम.के.फक्शन हॉलच्या परिसरातील मदिना हॉटेलचे मालक शेख युनुस शेख पाशा यांचा मृतदेह त्यांच्या राहत्या घरी रक्ताच्या थारोळ्यात आढळल्याची घटना १ सप्टेंबर रोजी उघडकीस आली होती. या खून प्रकरणात त्यांचा मुलगाच मुख्य सूत्रधार असल्याचे तपासाअंती निष्पन्न झाले आहे. त्यानंतर मयत हॉटेल चालकाच्या आरोपी मुलासह तिघांना न्यायालयात हजर केले असता आरोपींना चार दिवस म्हणजेच येत्या दि.१० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत, अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ते पुढे म्हणाले की,शहरातील खडकपूरा भागातील एम. के. फक्शन हॉलच्या पाठीमागे असलेले मदिना हॉटेलचे मालक शेख युनुस शेख पाशा यांचा मृतदेह रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला होता. या घटनेच्या तपासात सीसीटीव्ही फुटेज पोलीसांच्या हाती आल्यानंतर या खूनाचा प्रकार हॉटेल चालक शेख युनुस यांच्या मुलानेच केला असल्याचा पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर पोलिसांनी आरोपी मुलगा शेख यासेर अरफात याला ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता वडिल आईला सतत त्रास देत असल्याच्या रागातून त्याने हा खून मनमाड येथील आरोपी शेख अमजद शेख इसाक, योगेश शिवाजी निकम यांना सुपारी देवून केला असल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांच्या पोलीस कोठडीत ठेवण्याचे



आदेश न्यायालयाने दिले आहेत. या पत्रकार परिषदेला अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, सहाय्यक पोलीस अधीक्षक सी. एम. किरितिका, पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम आदिंची उपस्थिती होती.

दै. गोदातीर

# जबरी चोरीतील दोघांना अटक; गहाळ १५ मोबाईल जप्त

नांदेड– धर्माबाद येथील गुन्हे शोध पथकाने ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत जबरी चोरीतील दोन चोरट्यांना अटक केली. या चोरट्यांकडून नगदी सात हजार रुपये तर ठाण्याच्या हद्दीतून गहाळ झालेले १५ हजार मोबाईल जप्त केला आहे.

धर्माबाद पोलीस ठाण्यात मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर या गुन्ह्याचा उलगडा व्हावा यासाठी पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी आपल्या सहकाऱ्यांना सूचना दिल्या. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवून, घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी करुन, त्या आधारे सदर जबरी चोरीतील दोन आरोपींना २४ तासाचे आत धर्माबाद पोलिसांनी अटक केली.

संबंधित गुन्ह्यातील आरोपी शेख फेरोज अब्दुल करीम (वय २६ वर्ष रा. समता नगर धर्माबाद), साईनाथ नंदु माने (वय २९ वर्ष रा. देवीगल्ली धर्माबाद) यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात जबरीने काढून घेतलेले रोख सात हजार रुपये जप्त केले आहेत. तसेच धर्माबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ झालेले १५ मोबाईल जप्त करण्यात आले.